# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र १९३** **दिनांक १५/०७/२०२१**

## घटनास्थळावर मिळालेल्या तिकिटाच्या आधारावर बंगाली महिलेच्या खुनाचे गुढ ३६ तासात उघड- वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

दिनांक ०९/०७/२०२१ रोजी फिर्यादी यांनी वालीव पोलीस स्टेशनला खबर दिली की, फिर्यादी यांचे केळीचा पाडा, नायगाव पुर्व येथील चाळीत राहणारी महिला मयत नामे- मेहुबा बिबी साजु शेख हिचा तिचेसोबत गेले ४ दिवसापासुन राहणारा अज्ञात इसमाने ओढणीच्या सहाय्याने गळा आवळुन खुन करुन पळुन गेला आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून वालीव पोलीस ठाण्यात अनोळखी इसमाविरूध्द गुन्हा रजि. I ६५५/२०२१ भादंविस कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकारी यांनी लागलीच वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सदरचा गुन्हा उघडकिस येण्याचे दृष्टीने सुचना केल्या. घटनास्थळावर मिळालेल्या एका टिकीटाचा आधारावर आरोपीताचा भ्रमणध्वनी क्रमांक प्राप्त करुन माहीती घेतली असता तो गुन्हा करुन बागपत, उत्तरप्रदेश येथे पळुन गेल्याचे तांत्रिक गोष्टींच्या आधारे समोर आले असता वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच बागपत उत्तरप्रदेश येथे जाऊन त्याचे राठोडा येथील गावात सापळा रचला. आरोपीस पोलीसांबाबत चाहुल लागताच त्याने घराशेजारील शेतात पळ काढण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांनी त्याचा पाठलाग करुन त्यास उसाच्या शेतातुन ताब्यात घेतले.

सदर संशयिताकडे अधिक चौकशी केली असता माहिती समोर आली की, आरोपी हा सौदी येथे कंपनीत काम करीत असतांना त्याची बिगो ॲपव्दारे मयताशी ओळख होऊन दोघांमध्ये गेले १ वर्षापासुन प्रेमसंबध होते. गेले काही महिन्यांपासुन मयत ही आरोपीकडे वेळोवेळी पैशाची मागणी करुन आरोपीने इतर कोणाशी लग्न करायचे नाही असा तगादा लावुन मागणी पुर्ण केली नाही तर उत्तरप्रदेश येथे आरोपीचे घरी जाऊन सर्व हकीकत घरच्यांना सांगेण असे म्हणुन मयत ही आरोपीस ब्लॅकमेलींग करीत होती, अशी माहिती सांगीतली. दि.०४/०७/२०२१ रोजी आरोपी हा मयत हीस भेटण्याकरीता उत्तरप्रदेश येथुन नायगाव येथे आला असता याच वादातुन दोघांमध्ये वाद होऊन आरोपी याने ओढणीच्या सहाय्याने मयत हिचा तिचे राहते घरात गळा आवळुन खुन करुन अटक टाळण्यासाठी उत्तरप्रदेश येथे पळुन गेला होता. सदर गुन्हयात आरोपी नामे इस्माईल मकसूद खान वय-३० रा. मुळ ग्राम राठोड, तहसिल-बडद जि. बडद राज्य उत्तरप्रदेश यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त परी-२ वसई, श्री. अमोल मांडवे, सहा.पो.आयुक्त, तुंळीज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे व.पो.निरी. श्री. विलास चौगुले, पो.निरी. श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि. ज्ञानेश फडतरे, संतोष सांगविकर पो.अंम. योगेश देशमुख, मनोज मोरे, मुकेश पवार, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, अनिल सोनवणे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, विनेश कोकणी, सचिन बलीद, बालाजी गायकवाड, भालचंद्र बागुल, अमोल बर्डे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.